महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कार्यकारी संपादक : श्री. विजय यादव
jeevandeepvartanews2020@gmail.com
Rs.2/-
मुख्य संपादक : श्री. रविंद्र घोडविंदे

बुधवार ❖ १८ डिसेंबर २०२४ ❖ वर्ष ६ ❖ अंक - १७३ ❖ पाने - ४
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

शिवसेनेत अस्वस्थता?

नाराजी दूर करण्याचे शिंदेंसमोर आव्हान

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : रविवारी मंत्रिमंडळाचा विस्तार झाला, यामध्ये शिवसेना शिंदे गटाच्या ११ मंत्र्यांनी मंत्रिपदाची शपथ घेतली. मात्र या मंत्रिमंडळ विस्तारात आधी मंत्री असलेल्या अनेक बड्या नेत्यांना डच्चू देण्यात आला आहे. त्यामुळे शिवसेना शिंदे गटातील नेते अस्वस्थ असल्याची बातमी समोर येत आहे. या मंत्रिमंडळ विस्तारात अब्दुल सत्तार, तानाजी सावंत, दीपक केसरकर, विजय शिवतारे, प्रकाश सुर्वे यांचा पत्ता कट करण्यात आला आहे. त्यामुळे नेत्यांमधून नाराजी व्यक्त होत आहे. मंत्रिपदासाठी इच्छूक असलेल्या पवनी विधानसभा मतदारसंघाचे शिवसेना शिंदे गटाचे आमदार नरेंद्र भोंडेकर यांना मंत्रिपद न मिळाल्यानं त्यांनी काल उघड नाराजी व्यक्त केली होती. तसेच त्यांनी आपल्या शिवसेना उपनेते पदाचा राजीनामा देखील दिला. त्यांचं पक्षात काहीच योगदान नाही अशांना देखील मंत्रिपद मिळालं, ज्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप आहेत, त्यांना देखील मंत्रिपद मिळालं, जर मला जनतेला न्याय देता येत नसेल तर पदावर राहून काय उपयोग असा सवाल नरेंद्र भोंडेकर यांनी केला आहे.

दरम्यान नरेंद्र भोंडेकर यांच्याप्रमाणाचे विजय शिवतारे, प्रकाश सुर्वे आणि तानाजी सावंत हे देखील नाराज असल्याची चर्चा आहे, विजय शिवतारे यांनी उघड नाराजी व्यक्त केली आहे. विश्वासात न घेता मंत्रिमंडळ विस्तार झाला, आता आडीच वर्षांनी जरी मंत्रिपद मिळालं तरी मी घेणार नाही असं त्यांनी म्हटलं आहे. तर दुसरीकडे प्रकाश सुर्वे देखील नाराज आहेत. तानाजी सावंत यांच्याकडे गेल्यावेळी आरोग्य खातं होतं. मात्र यावेळी त्यांना मंत्रिमंडळातून डच्चू पान ४ वर ▶▶

एनटीए घेणार उच्च शिक्षण संस्थांच्या परीक्षा

केंद्रीय शिक्षणमंत्र्यांची माहिती

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

नवी दिल्लीः NTA २०२५ पासून फक्त उच्च शिक्षण संस्थांसाठी प्रवेश परीक्षा घेणार आहे. कोणतीही भरती परीक्षा नाही घेणार नाही, असे केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी आज संसदेत सांगितले. ते म्हणाले की ऊिं-ळउ परीक्षा पेन-पेपर पद्धतीने किंवा ऑनलाइन पद्धतीने आयोजित करावी याबद्दल आरोग्य मंत्रालयाशी चर्चा सुरू आहे.

ते पुढे म्हणाले की सरकार भविष्यात संगणक अनुकूल चाचणी आणि तंत्रज्ञान-आधारित प्रवेश परीक्षांकडे वळण्याचा विचार करत आहे. नॅशनल टेस्टिंग एजन्सी (NTA) ची २०२५ मध्ये पुनर्रचना केली जाईल, १० नवीन पदे निर्माण केली जात आहेत असे प्रधान यांनी सांगितले.

पत्रकार परिषदेत केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान म्हणाले, 'NTA मध्ये सुधारणा करण्यासाठी एक उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली होती. त्या समितीचा अहवाल आला आहे. कारवाईच्या अहवालाचा भाग म्हणून आम्ही सर्वोच्च न्यायालयाला तो दिला आहे. हा अहवाल आजच सार्वजनिक होईल.'

शिक्षणमंत्र्यांनी सांगितले की, NTA आपले कामकाज सुरळीत करेल. प्रवेश परीक्षांची वाढती गुंतागुंत हाताळण्यासाठी विशेष एजन्सीची गरज आहे. वास्तविक, NTA सध्या भरती परीक्षांसह पान ४ वर ▶▶

विधानपरिषद सभापतीपदासाठी

राम शिंदेंचे नाव चर्चेत

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

नागपूर : राज्यातील विधानसभा निवडणुकांच्या निकालानंतर महायुतीचं सरकार स्पष्ट बहुमताने व मोठ्या संख्याबळाने स्थापन झालं आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पदभार स्वीकारल्यानंतर राज्य मंत्रिमंडळाचा विस्तारही झाला. त्यामध्ये ३३ कॅबिनेट मंत्री व ३ राज्यमंत्र्यांचा शपथविधी संपन्न झाला. मात्र, राज्यातील सत्ताबदलानंतर विधिमंडळातील गणितंही बदलली आहेत. भाजपने १३२ जागांवर विजय मिळवत राज्यातील सर्वात मोठा पक्ष होण्याचा बहुमान पटकावला आहे. त्यामुळे, विधानसभा अध्यक्षपदाची माळ पुन्हा एकदा भाजपच्या गळ्यात पडली. आता, विधानपरिषदेच्या सभापतींच्या निवडीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. शिवसेना नेत्या आमदार निलम गोऱ्हे यांनाच पुन्हा सभापतीपदाची संधी मिळेल, असा विश्वास शिवसेना नेत्यांना आहे. मात्र, भाजपकडून राम शिंदे यांना संधी देण्यात येणार असल्याचे समजते. नुकत्याच झालेल्या निवडणुकीत राम शिंदे हे कर्जत-जामखेड मतदारसंघातून आमदार रोहित पवार यांच्याकडून पराभूत झाले आहेत.

फडणवीस सरकारच्या विधिमंडळ अधिवेशनाच्या रणधुमाळीत सध्या विधान परिषदेच्या सभापती निवडीची लगबग पाहायला मिळत आहे. विधानसभा अध्यक्षपदी पुन्हा एकदा राहुल नार्वेकर यांची निवड झाल्यानंतर आता विधानपरिषद सभापतीपदी कोणाची वर्णी लागणार याची उत्सुकता सर्वांनाच आहे. सध्या

राज सरकारचं हिवाळी अधिवेशन सुरू आहे. यातच विधानपरिषदेच्या सभापतीच्या निवडीचा मुहूर्त पार पडणार आहे. सध्या शिंदेंच्या शिवसेनेच्या डॉ. निलम गोऱ्हे या विधान परिषदेच्या उपसभापती आहेत. तर, सभापती पद रिक्त आहे. त्यामुळे आता विधान परिषदेच्या सभापतींची देखील लवकरच निवड केली जाणार आहे. भाजपकडून राम शिंदे यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाल्याची माहिती आहे. विधानपरिषद सभापती पदासाठी राम शिंदे यांचे नाव चर्चेत आहे, भाजपकडून उद्या सकाळी राम शिंदे अर्ज दाखल करण्याची शक्यता असल्याची माहिती सूत्रांनी दिली. त्यामुळे, भाजपकडून राम शिंदे यांचं पुनर्वसन करण्यात येत असल्याचे दिसून येते.

राष्ट्रवादीकडून मुख्य प्रतोद व प्रतोद पदाच्या निवडी

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या मुख्य प्रतोदपदी चेतन तुपे यांची निवड होण्याची शक्यता आहे. तर प्रतोदपदी चिपळूणचे आमदार शेखर निकम यांची घोषणा केली जाऊ शकते. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाकडून विधानसभा अध्यक्ष यांच्याकडे या दोन्ही आमदारांची नावे पाठविण्यात आल्याची सूत्रांची माहिती आहे.

राज्याला विरोधी पक्षनेताच नाही

दरम्यान, महायुतीला तब्बल २३७ जागांवर यश मिळाल्याने राज्यात विधानसभेच्या पान ४ वर ▶▶

मतदारसंघातील विकासकामांसाठी आमदार

किसन कथोरेंनी घेतली गडकरींची भेट

मुरबाड मतदारसंघातील विकास कामांचे काही महत्वाचे विषय केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्रालयाच्या माध्यमातून मार्गी लागणार आहेत. हे विषय मार्गी लावण्याच्या दृष्टीने केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांची नागपूर येथे त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली. बाकी या भेटीचे अन्य कोणतेही कारण नव्हते.

- किसन कथोरे
भाजप आमदार,
मुरबाड मतदारसंघ

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : मुरबाड विधानसभा मतदारसंघाचे नवनिर्वाचित भाजप आमदार किसन कथोरे यांनी मंगळवारी नागपूर येथे केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेतली. या भेटी दरम्यान मुरबाड मतदारसंघातील विकास कामांवर चर्चा केली, अशी माहिती आमदार किसन कथोरे यांनी प्रसिध्दी माध्यमांना दिली.

या भेटीच्यावेळी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी किसन कथोरे चौथ्यांदा आमदार म्हणून निवडून आल्याने त्यांचा राहत्या घरी सन्मान केला. यावेळी कथोरे यांनीही केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचा शाल, पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला. नागपूर येथील विधीमंडळ अधिवेशनाच्या निमित्ताने आमदार कथोरे नागपूर येथे आले आहेत. चौथ्यांदा आमदार म्हणून निवडून आल्याने आणि मुरबाड मतदारसंघाचा विकास कामांच्या माध्यमातून कायापालट केल्याने आमदार कथोरे यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मंत्रिमंडळात स्थान देण्यात यावे, अशी जोरदार मागणी आमदार कथोरे समर्थकांकडून करण्यात येत आहे.

आमदार कथोरे यांचा मंत्रिपदासाठी विचार न झाल्याने त्यांच्या समर्थकांमध्ये नाराजी आहे. जिल्ह्यातील भाजपमधील काही विरोधकांना तोंड देत आमदार कथोरे जिंकले आहेत. आमदार कथोरे यांना पराभूत करण्यासाठी विरोधकांची एक तगडी फळी मुरबाड मतदारसंघात सक्रिय होती. त्या सर्वांचे डावपेच उलटून लावत कथोरे यांनी विजय पान ४ वर ▶▶

म्हाडाची घरं भाडेतत्वावर?

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
☐ प्रतिनिधी

मुंबईत घरांचे दर आवाक्याबाहेर गेले आहेत. यामुळे मुंबईत घर खरेदी करणे आता सर्वसामाम्यांच्या बजेट बाहेर गेले आहे. मुंबईत आपलं हक्काचं घर असावे असावं अशी स्वप्न पाहणाऱ्यांना दिलासा मिळतो तो म्हाडामुळे. महाराष्ट्र गृहनिर्माण क्षेत्र विकास प्राधिकरण अर्थात म्हाडा सर्वसामान्यांना परवडतील असा दरात घरं उपलब्ध करुन देते. म्हाडाच्या लॉटरीत अनेक जण आपले नशिब आजमवतात. अनेकांचे घराचे स्वप्न म्हाडाच्या लॉटरीमुळे पूर्ण होते. घरांच्या विक्रीसह आता मुंबईत म्हाडची घरं भाडे तत्वावर मिळणार आहेत. म्हाडाच्या या निर्णयामुळे अनेकांना दिलासा मिळणार आहे.

येत्या पाच वर्षांत मुंबईत २.५० लाख नवीन घरे बांधण्याची घोषणा म्हाडाने केली आहे. परवडणाऱ्या घरांच्या किमती ३० टक्क्यांनी कमी करण्याच्या निर्णय देखील म्हाडा घेण्याची शक्यता आहे. यासह म्हाडाची घरे भाडे तत्वार देण्याचा मोठा निर्णय म्हाडाने घेतला आहे.

केंद्र शासनाच्या निती आयोगाच्या वतीनं मुंबई महानगर प्रदेशाची गृहनिर्माण क्षेत्रातील ग्रोथ हब म्हणून निवड करण्यात आली आहे. या भागात २०३० पर्यंत म्हणजेच पुढील पाच वर्षांमध्ये या भागात सुमारे ३० लाखांहून अधिक घरांची उभारणी करण्याचा मानस बाळगण्यात आला आहे. यातील सुमारे ८ लाख घरांच्या उभारणीची जबाबदारी म्हाडानं घेतली आहे.

मुंबईत म्हाडा ३ हजार हेक्टर जमीनवर गृहनिर्माण प्रकल्प उभारणार आहे. मुंबई परिसरातील ११४ विविध सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या इमारतींचा पुनर्विकास प्रकल्प देखील म्हाडा राबवणार आहे. जुन्या इमारतींच्या पुनर्विकासामुळे मुंबईत मोठ्या प्रमाणावर घर विक्रीसाठी उपलब्ध होणार आहे. विविध योजनांच्या माध्यमातून म्हाडाच्या मुंबई मंडळामार्फत पुढील पाच वर्षांत २.५० लाख घरे उपलब्ध होणार आहेत. काही महिन्यांपूर्वी म्हाडाची २,०३० घरांसाठी लॉटरी जाहीर झाली होती. १.२९ लाख लोकांनी ऑनलाइन नोंदणी केली होती. २०२३ मध्ये म्हाडाच्या ४,०८२ घरांच्या लॉटरीसाठी १.०९ लाख अर्ज प्राप्त झाले होते.

म्हाडाची पान ४ वर ▶▶

जिल्हा परिषदेमार्फत शेतकऱ्यांचा सन्मान

दै.ठाणे जीवनदीप वार्ता ☐ प्रतिनिधी

दि. १७ - जिल्हा परिषदेच्या कृषी विभागामार्फत कृषी दिन व शेतकरी सन्मान समारंभाचे आयोजन दि. १७ डिसेंबर २०२४ रोजी, बी.जे. हायस्कूल, कोर्ट नाका, ठाणे येथे माननीय मुख्य कार्यकारी अधिकारी श्री रोहन घुगे यांचे अध्यक्षतेखाली करण्यात आले होते. याप्रसंगी कृषि विभागातील घडीपत्रिकेचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कृषी क्षेत्र विकसीत करण्यासाठी जिल्हा परिषदेमार्फत विविध योजना राबविण्यात येत असून गट शेती तसेच तंत्रज्ञानाचा वापर करून शेती करण्यास प्राधान्य द्यावे, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. रोहन घुगे यांनी केले. पान ४ वर ▶▶

जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
सौ.कमलताई किसन कथोरे कॉलेज, म्हसा मुंबई विद्यापीठाशी संलग्न
ADMISSION OPEN 2024-25
११ वी व १२ वी
ARTS, COMMERCE, SCIENCE
UNDER GRADUATE: B.A., B.Com., B.Sc. CHEMISTRY, B.Sc. MATHS, BAF, BMS
POST GRADUATE: M.Sc. CHEMISTRY, M.Com. ADVANCED ACCOUNTANCY, M.A. MARATHI, M.A. ECONOMICS, M.A. SOCIOLOGY, M.A. HISTORY
Look forward to a BRIGHTER FUTURE
7719814142
9130580111

जहां नहीं चैना वहां नहीं रहना!

- छगन भुजबळ

मला त्यांनी बक्षिस दिलं आहे. कसलं बक्षिस दिलं हे माहीत नाही. पण तुम्ही विचारता त्यावर मी एका एका वाक्यात बोलत आहे. जे काही होईल ते अपेक्षित नव्हतं. मला वाटलंही नव्हतं. पण ठिक आहे. मी त्यांचा राज्यसभेचा प्रस्ताव नाकारला आहे. आता मी थेट नाशिकला जाणार आहे. माझ्या लोकांशी चर्चा करणार आहे, असंही त्यांनी स्पष्ट केलं.

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

देवेंद्र फडणवीस यांच्या मंत्रिमंडळात स्थान नाही मिळाल्याने राष्ट्रवादीचे सर्वात ज्येष्ठ नेते छगन भुजबळ नाराज आहेत. कालपासूनच भुजबळ यांनी उघडपणे नाराजी बोलून दाखवण्यास सुरुवात केली आहे. भुजबळ यांच्या समर्थकांनी तर नाशिकमध्ये हिंसक आंदोलनही केलं आहे. तर भुजबळांचा वापर केवळ ओबीसी मते मिळवण्यापुरता झाल्याचा आरोप अनेक ओबीसी नेत्यांनी केला आहे. छगन भुजबळ यांनी आजही या सर्व प्रकरणावर उघड नाराजी व्यक्त केली आहे. जहां नहीं चैना वहां नहींष्ठ असं म्हणत छगन भुजबळ यांनी अजितदादांची साथ सोडण्याचे संकेत दिले आहेत. भुजबळ यांनी नागपूर अधिवेशनात न थांबण्याचाही निर्णय घेतला असून दुखावलेले भुजबळ नाशिकला जाणार आहेत. छगन भुजबळ यांना मंत्रिपद डावलल्याने ते प्रचंड नाराज आहेत. आज मीडियाशी बोलताना त्यांनी आपल्या मनातील खदखद व्यक्त केली. तुम्हाला मंत्रिपद मिळालं नाही. तुम्ही अधिवेशनात थांबणार नाही का? तुमची पान ४ वर ▶▶

मतदान जनजागृती उपक्रमाची वर्ल्ड रेकॉर्ड इंडियामध्ये नोंद

जिल्हाधिकारी कार्यालय येथे आज वर्ल्ड रेकॉर्ड इंडियाच्या माध्यमातून सदर महाराष्ट्राचा नकाशा, त्याचा आकार व मानवी रांगोळी हा विक्रम झाल्याची घोषणा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता पालघर(प्रतिनिधी) :

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ नुकतीच पार पडली. या निवडणूकी दरम्यान मतदारांमध्ये जनजागृती करण्याच्या उद्देशाने स्वीप विभागाच्या अंतर्गत जिल्हाभर विविध उपक्रमांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्यात आली होती. याचाच एक भाग म्हणजे सोमवार दिनांक १८ नोव्हेंबर २०२४ रोजी आर्यन शाळेच्या मैदानावर १८० बाय १५६ म्हणजे २८ हजार ८० चौरस फूट आकाराचा महाराष्ट्राचा नकाशा तयार करून त्यात रांगोळी भरून म.नि.दांडेकर हायस्कूल पालघर, आर्यन इंग्लिश मीडीयम स्कूल पालघर व माध्यमिक विद्यालय भगिनी समाज पालघर या तीन शाळांमधील पंधराशे विद्यार्थ्यांनी मानवी रांगोळीच्या मदतीने महाराष्ट्राचा नकाशा तयार करण्यात आला होता व विद्यार्थ्यांना शपथ देण्यात आली होती. हा उपक्रम विजया जाधव, उपजिल्हाधिकारी (रोहयो) तथा स्वीप नोडल अधिकारी यांच्या संकल्पनेतून व जिल्हाधिकारी गोविंद बोडके यांच्या मार्गदर्शना खाली सदर कार्यक्रम पार पडला होता. जिल्हाधिकारी कार्यालय येथे आज वर्ल्ड रेकॉर्ड इंडियाच्या माध्यमातून सदर महाराष्ट्राचा नकाशा, त्याचा आकार व मानवी रांगोळी हा विक्रम झाल्याची घोषणा करण्यात आली. या विक्रमासंदर्भातील नोंद झाल्याचे प्रमाणपत्र जिल्हाधिकारी गोविंद बोडके यांच्याकडे सुपूर्त करण्यात आले. यावेळी वर्ल्ड रेकॉर्ड इंडियाचे अध्यक्ष पवन सोलंकी उपस्थित होते.

महारांगोळीच्या माध्यमातून मतदान जनजागृती करतांना झालेला हा विक्रम पालघर जिल्हयासाठी आनंदाची बाब आहे. पवन सोळंकी यांनी पालघरसारख्या आदिवासी बहुल भागात अशा प्रकारचा विक्रम होतांना मी प्रथमच पाहत असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले .

विजया जाधव यांनी शासनाने दिलेली जबाबदारी मतदानाची टक्केवारी वाढवून पार पाडलेली आहेच परंतु या कामासोबतच हा विक्रम सुध्दा नोंदवला गेलेला आहे त्यामुळे ही घटना कायम स्मरणात राहणार असल्याची भावना जिल्हाधिकारी गोविंद बोडके यांनी यावेळी व्यक्त केली.

या उपक्रमासाठी उपजिल्हाधिकारी तथा स्वीप नोडल अधिकारी विजया जाधव, शिक्षकांचे अध्यक्ष सुशिल शेजुळे, कलाशिक्षक प्रवीण अवतार, ज्ञानेश्वर माळी, भास्कर खेडकर, प्रितम घरत, सिताराम प्रभू, उज्वल पारगावकर यांच्या संयुक्त योगदानामुळे या उपक्रमाच्या विक्रमाची नोंद वर्ल्ड रेकॉर्ड इंडिया मध्ये करण्यात आली आहे. यासाठी रोहयो मधील श्रीमती. प्रितल राऊत व श्री. मनोज भदाणे कर्मचारी तसेच म.नि.दांडेकर हायस्कूल पालघर, आर्यन इंग्लिश मीडीयम स्कूल पालघर व माध्यमिक विद्यालय भगिनी समाज या शाळांचे मुख्याध्यापक यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

राज्य सरकारकडून बारदान उपलब्ध न झाल्यामुळे भात खरेदी लांबणीवर

दै.ठाणे जीवनदीप वार्ता/मुरबाड(प्रतिनिधी) :

मुरबाड तालुक्यात माजी आमदार गोटीरामभाऊ पवार यांच्या नेतृत्वाखाली तर ठाणे जिल्हा परिषद माजी उपाध्यक्ष सुभाष पवार यांच्या मार्गदर्शना खाली खरेदी विक्री संघातर्फे दरवर्षी तालुक्यातील हजारो शेतकऱ्यांचा भात खरेदी केला जातो त्या धर्तीवर यंदाही भात खरेदीसाठी ऑनलाइन पद्धत अवलंबली असून जवळपास हजोरा शेतकऱ्यांनी आपली भात खरेदीसाठी ऑनलाईन नोंदणी केली आहे परंतु भात खरेदी कधी होणार याकडे सर्व शेतकरी लक्ष लागले,, परंतु राज्य सरकारकडून बारदान भात खरेदीसाठी वेळेवर उपलब्ध होत नाही तोपर्यंत भात खरेदी लांबणीवर पडणार असे चित्र दिसून येत आहे. तसेच सर्व शेतकऱ्यांच्या वतीने सुद्धा शासनाकडे मागणी केली आहे लवकरात लवकर मुरबाड भात खरेदी विक्री संघाला भात खरेदी करण्यासाठी आदेश व बारदान देण्यात यावा अशी मागणी सर्व शेतकऱ्यांनी केली आहे.

त्यासाठी लवकरात लवकर बारदान उपलब्ध होण्यासाठी मुरबाड खरेदी विक्री संघातर्फे जोरदार प्रयत्न सुरू आहेत जर भात खरेदी बारदान उपलब्ध झाला तर लवकरात लवकर भात खरेदी सुरू होईल अशी माहिती मुरबाड खरेदी विक्री संघाकडून सांगण्यात आले आहे.

मुरबाड तहसील कार्यालयातर्फे

मोफत नेत्र तपासणी शिबिराला उत्कृष्ट प्रतिसाद

दै.ठाणे जीवनदीप वार्ता/ मुरबाड(बाळासाहेब भालेराव)

मुरबाड शहरातील नामांकित इन्फिगो आय केअर हॉस्पिटल व मुरबाड तहसील कार्यालय यांच्या माध्यमातून मुरबाड तहसील कार्यालयातील सर्व अधिकारी कर्मचारी व त्यांच्या कुटुंबासाठी मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन मुरबाड तहसील कार्यालय मार्फत मॅन्युफॅक्चर असोसिएशन हॉल मुरबाड येथे करण्यात आले होते.

या शिबिरात जवळपास ३५ अधिकारी व २० कर्मचारी सभाग नोंदवला शिबिरात सहभागी झालेल्या सर्व अधिकारी व कर्मचारी वर्गाला शिबिराचे पत्रक देण्यात आले. शिबिरात सहभागी झालेल्या सर्व अधिकारी व कर्मचारी वर्गाला हॉस्पिटल मध्ये परिपूर्ण नेत्र करून चष्मा व इतर बाबींवर विशेष सवलत दिली जाणार आहे शिबिराला पत्रकार बाळासाहेब भालेराव यांनी भेट दिली. या शिबिर यासाठी विशेष प्रयत्न इन्फिगो आय केअर हॉस्पिटल चे केंद्रप्रमुख रोहित झुंजारराव यांनी केले. तसेच शिबिराचे आयोजन केल्याबद्दल मुरबाड तहसील कार्याचे वतीने सर्व कर्मचारी व रोहित झुंजारराव यांचे तहसील कार्यालय मार्फत आभार प्रदर्शन करण्यात आले..

टिएमटीच्या कंत्राटी कर्मचाऱ्यांचा संप मागे

दै.ठाणे जीवनदीप वार्ता ठाणे(प्रतिनिधी) :

ठाणे महापालिका परिवहन उपक्रमातील टिएमटीच्या कंत्राटी कर्मचाऱ्यांनी मंगळवारी रात्री उशीरा संप मागे घेण्याचा निर्णय घेतला. कर्मचाऱ्यांच्या निव्वळ वेतनात साडे चार हजार रुपयांची वाढ करण्याचे आश्वासन प्रशासनाने दिल्यानंतर कर्मचाऱ्यांनी संप मागे घेतला. मंगळवारी दिवसभर सुरू असलेल्या या संपामुळे ठाणेकरांचे हाल झाले.

ठाणे महापालिका परिवहन उपक्रमाच्या ताफ्यात ४७४ बसगाड्या असून त्यापैकी ३९० बसगाड्या प्रत्यक्ष प्रवासी वाहतुकीसाठी उपलब्ध असतात. यातील २४० बसगाड्या कंत्राटी पद्धतीने चालविल्या जातात. मंगळवारी पहाटे या कंत्राटी पद्धतीने चालविल्या जाणाऱ्या बसगाड्यांवरील चालकांनी वेतनाच्या मुद्द्यावरून संप सुरू केला होता. त्याचा परिणाम ठाणेकरांना सहन करावा लागला. दिवसभर टिएमटीच्या थांबे, सॅटीस पुलावर प्रवाशांची गर्दी झाली होती. दरम्यान, संपाच्या कालावधीत केवळ १७० बसगाड्या उपलब्ध होत्या. टिएमटीच्या अधिकाऱ्यांनी संप मागे घेण्याची विनंती कर्मचाऱ्यांना केली. परंतु लिखीत स्वरूपात मागण्या मान्य केल्यास संप मागे घेण्याच्या निर्णयावर कर्मचारी ठाम होते. अखेर रात्री टिएमटीचे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या शिष्टमंडळाची चर्चा झाली. त्यानंतर रात्री ८.३० वाजताच्या सुमारास संप मागे घेण्याचा निर्णय कर्मचाऱ्यांनी घेतला.

कामगारांच्या वेतनामध्ये साडे चार हजार रुपयांची वाढ करण्याचे आश्वासन देण्यात आल्याचे टिएमटीचे व्यवस्थापक भालचंद्र बेहरे यांनी सांगितले. प्रवाशांच्या गैरसोयीबद्दल दिलगीरी व्यक्त करत बुधवारी पहाटेपासून टिएमटी बसगाड्यांची वाहतुक सुरळीत होणार असल्याचेही ते म्हणाले.

रायगडचा पालकमंत्री कोण ?

आदिती तटकरे की, भरत गोगावले

दै.ठाणे जीवनदीप वार्ता पेण(प्रतिनिधी) :

महायुती सरकारच्या मंत्रिमंडळाच्या पहिल्याच विस्तारात रविवारी रायगड जिल्ह्याला भरत गोगावले आणि आदिती तटकरे यांच्या रुपाने दोन मंत्रिपदे मिळाली आहेत. यामुळे रायगडात महायुतीची ताकद आणखी वाढली आहे. मात्र, जिल्ह्याचे पालकमंत्री पद मिळविण्यावरुन गोगावले आणि तटकरे यांच्यातील राजकीय संघर्ष पुन्हा उफाळून येण्याची शक्यता राजकीय वर्तुळातून व्यक्त होत आहे.

आता सर्वांनाच उत्सुकता आहे ती जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदाची ज्येष्ठतेनुसार पालकमंत्रीपदी भरत गोगावले विराजमान होणार की खा. सुनील तटकरे हे राजकीय कुरघोडी करुन पुन्हा पालकमंत्री पद अदिती तटकरे यांना मिळवून देणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

महाविकास आघाडी सरकारच्या काळात तत्कालीन पालकमंत्री आदिती तटकरे यांना भरत गोगावलेआ. महेंद्र दळवी, आ. महेंद्र थोरवे या तिन्ही शिवसेनेच्या आमदारांनी कडाडून विरोध केला होता.त्यावरुन खा. सुनील तटकरे आणि आ. भरत गोगावले यांच्यात राजकीय वादविवाद झाले होते. पण नंतर राजकीय बदलानंतर महायुती सरकारच्या काळात शिवसेनेचे उदय सामंत हे रायगडचे पालकमंत्री झाले, आता त्याच मुद्यावरून पुन्हा राजकीय संघर्ष निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.नागपूर येथे राज्य मंत्रिमंडळाचा शपथविधी रविवारी (ता. १५) पार पडला. यामध्ये मागील सरकारामधील राष्ट्रवादीच्या आदिती तटकरे या महिला बालकल्याण विभागाच्या मंत्री होत्या. त्यांना पुन्हा मंत्रिमंडळात स्थान देण्यात आले आहे.मागील अडीच वर्षांपासून मंत्री बनवण्याचे स्वप्न पाहणाऱ्या शिवसेनेचे आ. भरत गोगावले यांनाही मंत्री करुन त्यांची स्वप्नपूर्ती करण्यात आली आहे.आतापर्यंतच्या रायगडच्या राजकीय इतिहासात प्रथमच दोन कॅबिनेट मंत्रीपदे जिल्ह्याला मिळाली आहेत. दोन मंत्र्यांमुळे रायगडचा विकासाचा मार्ग आता खुला झाल्याची प्रतिक्रिया सर्व स्तरातून व्यक्त होत आहे.

दोन हजाराहून अधिक विद्यार्थी देणार जवाहर नवोदय विद्यालयाची परीक्षा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता पेण(प्रतिनिधी) :

निजामपूर ता.माणगाव येथील पीएमसी स्कूल जवाहर नवोदय विद्यालयाची इयत्ता सहावी साठी प्रवेश परीक्षा १८ जानेवारी २०२५ रोजी रायगड जिल्ह्यातील एकूण १५ तालुक्यातील परीक्षा केंद्रावर होणार आहे. त्यासाठीचे प्रवेश पत्र https://cbseitms.rcil.gov.in/nvs/AdminCard/AdminCard व https:// navodaya. gov.in वेबसाईटवरून संबंधित उमेदवारांनी डाउन लोड करून घ्यावेत अशी माहिती विद्यालयाचे प्रभारी प्राचार्य मनोज राऊत यांनी दिली आहे.जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील परीक्षा केंद्रावर एकूण २ हजार ३७४ विद्यार्थी यावेळी इयत्ता सहावी वर्ग पात्रता परीक्षेसाठी बसत आहेत. एकूण ८० जागांसाठी यातून विद्यार्थी निवडले जाणार असून परीक्षा पात्र विद्यार्थ्यांची नावे आणि त्यांच्या रजिस्ट्रेशन क्रमांक परीक्षा ओळखपत्रे या https://cbseitms.rcil.gov.in/nvs/AdminCard/AdminCard ke https:// navodaya.gov.in संकेतस्थळावर ऑनलाईन उपलब्ध करून देण्यात आली आहेत.विद्यार्थी रजिस्ट्रेशन क्रमांक आणि विद्यार्थी जन्मतारीख हे ओळखपत्राचे पासवर्ड असणार आहेत सर्व परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांनी दि. १८ जानेवारी २०२५ रोजी सकाळी १० वाजता परीक्षा केंद्रावर उपस्थित राहावे. विद्यार्थी आणि पालकांना याबाबत काही माहिती हवी असेल तर त्यांनी संतोष चिंचकर ९८८१३५१६०१,अर्जुन गायकवाड ९८६२७९३६४०, वर्षा सावंत ७२७६००८३९९ यांना संपर्क साधावा.

टोकावडे परिसरातील रस्त्यावर खड्डे !

दुरुस्तीकडे सार्वजनिक बांधकाम खात्याचे दुर्लक्ष

टोकावडे करचोंडे चासोळे तळेगाव रस्त्यावर दिशादर्शक फलक लावण्याची वाहन चालकांची मागणी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता/मुरबाड(प्रतिनिधी) :

ठाणे जिल्ह्यातील इतर जिल्हा मार्गात समावेश असलेल्या इतर जिल्हा मार्ग १११ टोकावडे मार्गे करचोंडे चासोळे जडाई अंबिवली या बारा किलोमीटर रस्त्याच्या दुतर्फा वाढलेली झाडे अर्थात रस्त्याची डागडुजी १९९८ पासून रस्ता डांबरीकरण झाल्यापासून झालीच नसल्याची खंत करचोंडे येथील सामाजिक कार्यकर्ते रमेश घरत यांनी माहिती देताना सांगितले

तसेच या रस्त्यावर अजून पर्यंत सार्वजनिक बांधकाम खात्याकडून दिशादर्शक सूचनाफलक नाम फलक लावण्यात आले नाहीत याबाबतही त्यांनी खंत व्यक्त केली आहे

सार्वजनिक बांधकाम खात्याने त्याची दखल घेऊन करचोंडे ते तळेगाव दरम्यान रस्त्यावर दिशादर्शक किलोमीटर अंतर गावांची नावे असे नाम फलक लावावेत तसेच धोकादायक वळण पुढे वळण आहे असे विविध माहिती देणारे दिशादर्शक फलक लावण्याची मागणी ही त्यांनी केली आहे

शिवसेना भाजपा युतीचे सरकार १९९५ साली सत्तेत आल्यानंतर पहिले मुख्यमंत्री मनोहर जोशी यांच्या कार्यकाळात व मुरबाड तालुक्याचे शिवसेना- भाजपा युतीचे पहिले आमदार दिवंगत दिगंबर विशे यांच्या कार्यकाळात या रस्त्याचे डांबरीकरण करण्यात आले या रस्त्याचे रुंदीकरण करावे अशी मागणी ही अनेक वेळा येथील स्थानिक वाहन चालक ग्रामस्थ यांच्याकडून होत आहे मात्र १९९८ ते २०२४ त्या कार्यक्रमांमध्ये हा रस्ता दुतर्फा रस्त्याला वाढलेली झाडे दिशादर्शक फलक यापासून दुर्लक्षित राहिला आहे सार्वजनिक बांधकाम खात्याच्या अधिकारी वर्गाने या रस्त्याच्या डागडुजीकडे दुर्लक्ष केले आहे हा रस्ता अनेक ठिकाणी वळणावर धोकादाय स्थितीत असून संरक्षण भिंत बांधण्याची आवश्यकता असतानाही या सर्वच कामाकडे दुर्लक्ष झालेले आहे सद्य स्थितीला चासोळे गावाजवळील काळू नदीवरील पूल विना कठड्याचा असल्याने रात्रीच्या वेळेस मोठा अपघात होण्याची भीती वाहन चालकांकडून व्यक्त केली जात आहे काही दिवसापूर्वीच मुरबाड आगारातून सुरू करण्यात आलेली फांगलोषी बसही धोका पत्करून बस चालक नेत आहेत हा पुल अरुंद विनायक कठड्याचा पश असल्याने त्यावर संरक्षण भिंत तात्काळ बांधावेत अशी मागणी ही चासोळे ग्रामस्थांकडून अनेकदा करण्यात आली आहे मात्र त्या मागणीकडे सातत्याने दुर्लक्ष करण्यात आले आहे अशी खंत रमेश घरत यांनी व्यक्त केली आहे एकंदरीत या रस्त्याचे जागोजागी पडलेले खड्डे दिशादर्शक फलक लावण्याची मागणी सार्वजनिक बांधकाम खात्याने गांभीर्याने घ्यावी अशी मागणी घरत यांनी माहिती देताना सांगितले १९९८ पासून आतापर्यंत या भागामध्ये तळेगाव आंबिवली जडई चासोले केव्हारवाडी पारधवाडी मोहवाडी झाडघर कुडशेत करचोंडे बोरवाडी या गावांचे नाम फलक लावण्यात यावेत अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते रमेश घरत यांनी केली आहे.

वैष्णो व्हिजन संस्थेच्या वतीने १९ डिसेंबर रोजी

'पन्नाशीतील ग्रंथाली'या विशेष कार्यक्रमाचे आयोजन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता ठाणे(प्रतिनिधी) :

मराठी साहित्य विश्वातील लोकप्रिय 'ग्रंथाली'या संस्थेला दि.२५ डिसेंबर २०२४ रोजी पन्नास वर्षे पूर्ण होत आहे. त्यानिमित्ताने वैष्णो व्हिजन संस्थेच्या वतीने गुरुवार दि.१९ डिसेंबर २०२४ रोजी संध्याकाळी ५ वाजता मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे(प.) येथे 'पन्नाशीतील ग्रंथाली'या विशेष गप्पा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

स्नेहनिमंत्रण
वैष्णो व्हिजन
आयोजित
ग्रंथाली च्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त
विशेष गप्पांचा कार्यक्रम
स्नेहनिमंत्रण
सुवर्ण महोत्सवी वर्ष
50
पन्नाशीतील
ग्रंथाली

या कार्यक्रमाचे अध्यक्ष पंचागकर्ते, खगोलशास्त्र अभ्यासक श्री.दा.कृ. सोमण हे आहेत. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे एस. एम.सी. इन्फ्रास्टक्चर संचालक श्री.सुहास मेहता हे असून विशेष निमंत्रित म्हणून मराठी भाषा विभाग संस्था, महाराष्ट्र राज्य आणि महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोष निर्मिती मंडळाचे संचालक डॉ.शामकांत देवरे व ठाणे जिल्हा माहिती अधिकारी श्री.मनोज शिवाजी सानप हे उपस्थित राहणार आहेत.

या गप्पा कार्यक्रमात माजी राज्यसभा सदस्य तथा ज्येष्ठ पत्रकार, संपादक श्री.कुमार केतकर, ज्येष्ठ पत्रकार, संपादक श्री.दिनकर गांगल, ग्रंथालीचे संपादक श्री.अरुण जोशी, ग्रंथाली संस्थेच्या विश्वस्त डॉ.लतिका भानुशाली व डॉ.मृण्मयी भजक यांचा सहभाग आहे. या कार्यक्रमात मुलाखतकार म्हणून जयु भाटकर हे असणार आहेत. तर संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.अस्मिता पांडे करणार आहेत.या कार्यक्रमाच्या निमित्ताने ठाण्यातील साहित्यिक अनंत देशमुख, अशोक बागवे, अनुपमा उजगरे, चांगदेव काळे आणि डॉ.निर्मोही फडके या साहित्यिकांचा सत्कारही करण्यात येणार आहे.तरी, या कार्यक्रमासाठी रसिकांनी मराठी ग्रंथसंग्रहालय, पहिला मजला, वा.अ. रेगे सभागृह, स्टेशन रोड, ठाणे (प.) येथे दि.१९ डिसेंबर २०२४ रोजी सायंकाळी ५ वाजता उपस्थित राहावे, असे आवाहन वैष्णो व्हिजन संस्थेच्या संस्थापक व कार्यकारी निर्माती पद्मा भाटकर यांनी केले आहे.

दैनिक राशिफल

१८ डिसेंबर २०२४

बुधवार

मेष

वकिलांसाठी आजचा दिवस अत्यंत आनंदाचा जाणार आहे. आर्थिक भरभराट होण्याची शक्यता आहे. नवीन केसेस मिळण्याचीही शक्यता आहे.

वृषभ

मनात आनंद राहील. घरात एखादं धार्मिक कार्याचं आयोजन केलं जाईल. घर किंवा वाहनाशी संबंधात मोठा खर्च करावा लागणार आहे.

मिथुन

शुल्लक कारणावरून शेजाऱ्याशी वाद घालाल. शेजारणीशी कडाक्याचं भांडण होईल. त्यामुळे रागावर नियंत्रण ठेवा. आर्थिक देवाणघेवाण करताना जपून.

कर्क

प्रेमात अपयश येण्याची शक्यता आहे. अत्यंत सावध राहा.नव्या जबाबदाऱ्या मिळण्याची शक्यता आहे. कामचुकारपणा करण्याऐवजी लक्ष देऊन काम करा.

सिंह

अनावश्यक गोष्टींमध्ये आज दिवस जाईल. मित्र मंडळींना वेळ देऊ शकणार नाही. घरात सुख शांती राहील. प्रियकर आणि प्रेयसीमध्ये सामंजस्य वाढेल.

कन्या

प्रदूषणाच्या ठिकाणी आणि धांगडधिंगा असलेल्या ठिकाणी जाऊ नका. नाही तर त्रास होईल. खोकला, सर्दी होण्याची शक्यता आहे. आरोग्याची काळजी घ्या.

तूळ

तुमच्या हातून एक मोठी संधी जाणार आहे. तुमच्या आळशी स्वभावामुळे ही संधी हुकणार आहे. नोकरीमध्ये टार्गेट पूर्ण करणाऱ्यांना सन्मान मिळेल.

वृश्चिक

प्रेम अधिक वृद्धिंगत होईल. गावाकडे जाण्याचा योग आहे. कोर्टकचेरीची कामे मार्गी लावा. पोलीस स्टेशनला जाण्याची वेळ येऊ शकते.

धनु

समस्या सोडवण्यावर भर द्या. नाही तर अडचणी वाढतील. कोर्टाच्या प्रकरणाकडे दुर्लक्ष करू नका. नाही तर अडचणीत याल. दिवस कडकीचा जाणार आहे.

मकर

बायकोसोबत असलेला दूरावा दूर होईल. सर्व गैरसमज दूर होतील. आरोग्याच्या कुरबुरी सुरू राहतील.पूर्वीपेक्षा आता आर्थिक स्थिती चांगली राहील.

कुंभ

लोकलमधून प्रवास करताना कुणाशीही वाद घालू नका.दिवस मनाजोगा आहे. सिनेमाला जाण्याचा बेत आखाल. सासूरवाडीकडील वाद संपुष्टत येईल.

मीन

प्रेयसीसोबत डेटिंगला जाण्याचा बेत रद्द कराल. दिवसभर आळसावलेली स्थिती राहील. ऑफिसमध्ये जोरदार भांडणं होतील. घरात बायकोशी भांडण होईल.

दैनिक जीवनदीप वार्ता
मध्ये कंपनी, मिळकत, जमीन- जुमला, सहकारी संस्थांच्या नोटीस तसेच बक्षीसपत्र, घटस्फोट, पोटगी, नावात बदल आदी कायदेविषयक छोट्या जाहिरातीना केवळ ५००/- रुपयांत प्रसिद्धी दिली जाईल; कोणत्याही शासकीय नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क साधा.
:: कार्यालय ::
९६१९१८८५५८ / ९१५८०७८६०१
- E Mail -
jeevandeepvartanews2020@gmail.com news.thanejeevandeep@gmail.com

रेरा घोटाळ्यात फसवणूक झालेल्या

कल्याण-डोंबिवलीतील ग्राहकांना न्याय द्यावा

दै.ठाणे जीवनदिप वार्ता ठाणे(प्रतिनिधी) :

कल्याण-डोंबिवली महापालिकेच्या हद्दीतील काही इमारतींमधील रेरा नोंदणी घोटाळ्यात सामान्य ग्राहकांची फसवणूक करण्यात आली. आता या इमारती जमीनदोस्त करण्यासाठी महापालिकेने नोटीस बजाविल्यानंतर रहिवाशी हवालदिल झाले आहेत. या रहिवाशांना महापालिकेने दिलासा देण्यासाठी निर्देश द्यावेत. तसेच संबंधित बिल्डरांविरोधात मोक्का कायद्यान्वये कारवाई करावी, अशी मागणी भाजपाचे आमदार निरंजन डावखरे यांनी विधान परिषदेत 'पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन'द्वारे केली.

घरग्राहकांच्या संरक्षणासाठी असलेल्या रेरा कायद्यांतर्गतची नोंदणी व बिल्डरने कागदपत्रांची तपासणी केल्यानंतर अनेक राष्ट्रीयीकृत व खासगी बॅंकांकडून मंजूर झालेल्या कर्जातून कल्याण-डोंबिवलीतील ५८ इमारतींमध्ये शेकडो रहिवाशांनी घरे घेतली असून, सहा हजार नागरिक राहत आहेत. कालांतराने रेरा कायद्याअंतर्गत मंजुरी मिळविण्यासाठी बिल्डरांनी महापालिकेकडे बनावट कागदपत्रे सादर केली असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. त्यानंतर महापालिकेने संबंधित इमारती जमीनदोस्त करण्यासाठी कारवाई सुरू केली आहे. या प्रकारामुळे रहिवाशी हवालदिल झाले आहेत. या रहिवाशांची व्यथा आमदार निरंजन डावखरे यांनी विधान परिषदेत आज मांडली.

या प्रकरणाची राज्य सरकारने दखल घ्यावी. तसेच सामान्य ग्राहकांना दिलासा देण्यासाठी कल्याण-डोंबिवली महापालिकेला निर्देश द्यावेत. तसेच या प्रकरणी बिल्डरांवर मोक्का अंतर्गत कठोर कारवाई करावी, अशी मागणी आमदार डावखरे यांनी केली.

खंडेलवाल भारत जागरण रथयात्रेचे कल्याणमध्ये भव्य स्वागत

दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी) :

खंडेलधाम भारत जागरण रथयात्रेचे कल्याणमध्ये भव्य स्वागत करण्यात आले. हा प्रवास जयपूर राजस्थानमधील खंडेलधाम येथून सुरू झाला असून भारताचा दौरा करण्यात आला आहे.

खंडेलधाम रथयात्रेत खंडेलवाल समाजाच्या एकूण ७२ गोत्रांच्या देवी आहेत. सोमवारी अखिल भारतीय खंडेलवाल वैश्य महासभेचे अध्यक्ष रमेश बडाया यांच्या मार्गदर्शनाखाली रथयात्रा कल्याणमध्ये पोहोचली. रथयात्रेचे 'खंडेलवाल सेवा समिती' कल्याण व जागृती महिला मंडळातर्फे नमस्कार मंडळात भव्य स्वागत करण्यात आले.

समाजातील लोकांनी नमस्कार मंडळाकडून नाच-गाणी करत समेल सभागृह गाठले व तेथे कुलदेवीचे पूजन करून समाजातील मान्यवरांचा सत्कार केला.

या कार्यक्रमात 'खंडेलवाल सेवा समिति' कल्याणचे अध्यक्ष सुरेश खंडेलवाल, राजेश खंडेलवाल, जागृति महिला मंडळाच्या अध्यक्ष हेमा घीया, सचिव रूपाली खंडेलवाल, कार्याध्यक्ष मनीषा खंडेलवाल, रमेश खंडेलवाल, जगदीश प्रसाद खंडेलवाल, राकेश खंडेलवाल, राजेंद्र खंडेलवाल, पुरुषोत्तम खंडेलवाल, एड.नरेश खंडेलवाल, ललित मोहन खंडेलवाल, विनीता राकेश खंडेलवाल, शोभा खंडेलवाल, रचना राजोरिया, मीता शाह, मयूरी खंडेलवाल आदींसह समाजाचे बांधव उपस्थित होते.

आमदार कुमार आयलानी यांच्या वाढदिवसानिमित्त

म्हारळ गावामध्ये डोळे तपासणी शिबीर

दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी) :

उल्हासनगर विधानसभा मतदारसंघाचे कार्यसम्राट आमदार कुमार आयलानी यांच्या १६ डिसेंबर या वाढदिवसाच्या निमित्ताने म्हारळ गावातील सामाजिक कार्यकर्ते आणि संयोजक कल्याण पंचायत समितीच्या माझी सभापती अस्मिता अजय जाधव या पुढाकाराने गावातील मैत्री बुद्ध विहारात ईशा नेत्रालय यांच्या सौजन्याने मोफत नेत्र/डोळे तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते, यावेळी शेकडो गरजूनी याचा लाभ घेतला.

उल्हासनगर चे आमदार कुमार आयलानी यांनी म्हारळ, वरप, कांबा या गावासाठी लाखो रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. त्यामुळे त्यांचे ऋण सामाजिक कार्यातूनच उतरावे म्हणून म्हारळ गावातील सामाजिक कार्यकर्ते सत्यजीत जाधव, आदेश गायकवाड, विनोद सकपाळ, आणि किरण भोईर यांच्या पुढाकाराने व कल्याण पंचायत समितीच्या माझी सभापती व विशेष कार्यकारी अधिकारी, अस्मिता अजय जाधव यांच्या संयोजणांने ईशा नेत्रालय यांच्या सौजन्याने १६ डिसेंबर या आमदार कुमार आयलानी यांच्या वाढदिवसानिमित्त मोफत डोळे तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.याकरिता म्हारळ ग्रामपंचायतीचे सरपंच योगेश देशमुख, सदस्य अँड दिपक अहिरे, लक्ष्मण कोंगिरे,भाजपा मंडळ अध्यक्ष, महेश देशमुख, ग्रामपंचायत कर्मचारी संघटनेचे ठाणे जिल्हा अध्यक्ष, अजय जाधव, समाजसेवक जयसिंग जाधव,दिपक खांडेकर, केतन देशमुख, आदी मंडळी उपस्थित होते. यावेळी ईशा नेत्रालयाचे डॉक्टर व त्यांच्या टिमने शेकडो गरजू लोकांचे डोळे तपासून त्यांना पुढील उपचारासाठी मार्गदर्शन व सहाय्य केले

आमदार कुमार आयलानी यांच्या वाढदिवसानिमित्त राबविलेल्या या सामाजिक उपक्रमाचे परिसरातील अनेकांनी कौतुक केले.

सराफाच्या दुकानात कोटयवधीचे दागिने चोरीला

दै.ठाणे जीवनदिप वार्ता ठाणे(प्रतिनिधी) :

ठाणे रेल्वे स्थानक परिसरात सराफाचे दुकान आहे. मंगळवारी मध्यरात्री या सराफाच्या दुकानाचा लोखंडी शटर तोडून दोन दरोडेखोरांनी दुकानात प्रवेश केला. ठाणे रेल्वे स्थानक परिसरात मंगळवारी मध्यरात्री एका सराफाच्या दुकानात दरोडा टाकण्यात आला आहे.

या दुकानातील सोन्याचे दागिने दरोडेखोरांनी चोरी केले. सुमारे सात किलो वजनाचे हे दागिने असल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे. नौपाडा पोलीस आणि ठाणे गुन्हे अन्वेषण पथक घटनास्थळी दाखल झाले.

याप्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

पाणी प्रश्ना संदर्भात भाजपाचा नागरिकांसह रिकामे हंडे घेउन बैलगाडी मोर्चा

केडीएमसीच्या अ प्रभाग क्षेत्र कार्यालयावर काढला मोर्चा

पाणी टंचाई संदर्भात नागरिकांचा प्रंचड रोष

दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी) :

कल्याण डोंबिवली मनपाच्या 'अ' प्रभागक्षेत्राच्या कार्यालयावर रिकामे हंडे घेऊन बैलगाडी तून येत स्थानिक नागरिकासह भाजपाच्या वतीने मांडा-टिटवाळा परिसरातील गंभीर पाणीटंचाईला कंटाळून मनपा प्रशासनाविरोधात मोर्चा मंगळवारी दुपारी काढण्यात आला. पाणी टंचाई प्रश्न लवकर सुटला नाही तर प्रशासनाविरोधात तीव्र आंदोलनाचा इशारा मोर्च्याकरांनी दिला. मागील अनेक महिन्यांपासून नागरिकांना पुरेशा प्रमाणात पाणी मिळत नसल्यामुळे नागरिकांची मोठी गैरसोय होत होती. याबाबत पाणी पुरवठा विभागाचे उपअभियंता कार्यकरी सराफ यांच्याकडे वारंवार पाठपुरावा करुनही कोणतीच उपायोजना करण्यात आली नव्हती. अखेर नागरिकांचा संयमाचा बांध फुटल्याने संतप्त होत रिकाम्याहंडासह 'अ' प्रभाग कार्यालयावर भाजपाच्या वतीने बैलगाडी मोर्चा काढण्यात आला. या मोर्चाचे नेतृत्व भाजपाचे मोहना मंडळ अध्यक्ष शक्तीवान भोईर यांनी केले होते.

या पाणी प्रश्नी मोर्च्यामध्ये महिला वर्गासह नागरिक, भाजपा पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. 'धरण आमाच्या ऊशाला कोरड मात्र घश्याला, 'पाणी आमच्या हक्काचे नाही उप अभियंता सराफांच्या मालकीचे', 'पाणी आता नियमित मिळालेच पाहिजे, पालिकेला जाग आलीच पाहिजे, अश्या घोषवाक्याचे फलक हातात घोषणा देत घोषणांनी परिसर मोर्चे करांनी दणाणून टाकला. उप अभियंता सराफ यांची तातडीने बदली करावी.मांडा-टिटवाळा येथील सोसायट्यांना जाणिवपूर्वक कमी दाबाने होणाऱ्या पाणीपुरवठ्यावर उपाययोजना करावी, मोहिली जलशुद्धीकरण केंद्र ते मांडा-टिटवाळा मुख्य पाण्याच्या लाईनवर प्रेशरगेज मशीन बसवावे, मुख्य पाण्याच्या लाईनवर अधिकारी यांच्या संगनमताने अनधिकृत नळ जोडण्यात आले असून त्यावर कारवाई करावी, पावसाळ्यात नदीतील जलपर्णीमुळे रॉ वॉटर पंपींग थांबते, यावर कायमस्वरूपी उपाययोजना करावी,

काळू नदीवरील बंधाऱ्याची उंची वाढवून गळती थांबवावी. अवैध नळ जोडण्यासाठी घेतले जाणारे ३०-४० हजार रुपयांचे गैरव्यवहार थांबवावेत, प्रभागातील सर्व अनधिकृत नळ जोडण्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी या मोर्चातील प्रमुख मागण्या होत्या.पाणीटंचाईच्या समस्येकडे दुर्लक्ष केल्यास तसेच मागण्या लवकरात लवकर पुर्ण न झाल्यास पालिका मुख्यालयावर मोठ्या संख्येने आंदोलनाचा इशारा माजी उपमहापौर उपेक्षा भोईर यांसह आंदोलकांनी दिला आहे. यावेळी रेल्वे पुलाखालुन पाण्याची लाईन टाकाण्याचे काम हे १५ जानेवारी पर्यंत पुर्ण होणार आहे . तसेच मार्च अखेर पर्यंत मांडा प. साठी बांधण्यात येणा-या टाकीचे देखील काम पुर्ण होणार असल्याने पाणी टंचाईचा प्रश्न सुटणार असल्याचे यावेळी (कार्यकरी पाणी पुरवठा विभाग) अभियंता अशोक घोडे यांनी सांगितले. तसेच वाढ्त्या लोकसंख्येच्या अनुषंगाने पाणीसाठा वाढवण्याबाबत शासनाशी बोलणे चालु असुन हा प्रश्न मार्गी लागणार आहे . त्याचबरोबर ज्या ज्या ठिकाणी पाणी समस्या आहे त्या त्या ठिकाणी व्यक्तीश : भेट देउन उपायोजना करण्या संदर्भात तातडीने पावले उचलण्यात येतील असे देखील त्यांनी आश्वासित केले.

या मोर्च्यात भाजपाचे शक्तिवान भोईर, माजी उपमहापौर उपेक्षा भोईर नवनाथ पाटील, कैलास पाटील, किरण रोठे , विजय आव्हाड , रुपेश भोईर , नवनाथ पाटील, कैलास पाटील, रमेश कोनकर, प्रमोद घरत सुनील केदारे ,दिपक कांबळे,सुभाष पिसाळ,सारीका पाटील, जिगीशा जैसवाल, यामिनी चव्हाण भाजपा पदाधिकारी कार्यकर्ते आणि यासह असंख्य टिटवाळयातील नागरिक उत्स्फुर्तपणे सहभागी झाले होते .

सुशासन सप्ताह अंतर्गत

'प्रशासन गाव की ओर'

अभियानाच्या यशस्वीततेसाठी जिल्ह्यातील कार्यालयप्रमुखांची बैठक संपन्न

दै.ठाणे जीवनदिप वार्ता ठाणे(प्रतिनिधी) :

केंद्र शासनाच्या प्रशासकीय सुधार विभागामार्फत सुशासन सप्ताह अंतर्गत 'प्रशासन गाव की ओर' हे अभियान दि.१९ ते २४ डिसेंबर २०२४ या कालावधीत राबविण्यात येणार आहे.हे अभियान जिल्ह्यामध्ये राबविण्याकरिता पूर्वतयारी करण्यासाठी जिल्ह्यातील कार्यालयप्रमुखांची बैठक काल दि.१६ डिसेंबर २०२४ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील समिती सभागृहामध्ये आयोजित करण्यात आली होती. या अभियानाच्या कालावधीत आयोजित करावयाच्या उपक्रमांची माहिती या बैठकीत संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आली.

यावेळी उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) हरिश्चंद्र पाटील, ठाणे जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अजिंक्य पवार, ठाणे महानगरपालिकेचे उपायुक्त जी.जी. गोदेपुरे, सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.स्वाती शिंदे, भिवंडी सहाय्यक कामगार आयुक्त आनंद भोसले, ठाणे सहाय्यक कामगार आयुक्त अनिल कुटे, सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी योगेश जंगले, उप कार्यकारी अभियंता जे.आर. सोनार, सरकारी कामगार अधिकारी दीपा भिसे हे उपस्थित होते.

खरीप पणन हंगाम २०२४-२५ मध्ये

धान/भरडधान्य खरेदीसाठी शेतकरी नोंदणीकरिता दि.३१ डिसेंबर पर्यंत मुदतवाढ

दै.ठाणे जीवनदिप वार्ता ठाणे(प्रतिनिधी) :

खरीप पणन हंगाम २०२४-२५ मध्ये किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत धान/भरडधान्य खरेदीसाठी ऑनलाईन शेतकरी नोंदणीकरिता याआधी दि.१५ डिसेंबर २०२४ पर्यंत मुदत देण्यात आली होती. मात्र, अभिकर्ता संस्थांनी नोंदणीस मुदतवाढ देण्याच्या विनंतीच्या अनुषंगाने खरीप पणन हंगाम २०२४-२५ मध्ये धान/भरडधान्य खरेदीकरिता शेतकऱ्यांच्या नोंदणी प्रक्रियेला दि.३१ डिसेंबर २०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे, असे शासनाचे अवर सचिव श्री.विकास राऊत यांनी कळविले आहे.

'जिंकी रे जिंकी' सिनेमा शालेय विद्यार्थ्यांना दाखविण्यास स्थगिती

दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी) :

श्री समर्थ फिल्म्स निर्मित 'जिंकी रे जिंकी' हा शैक्षणिक व सामाजिक प्रबोधनात्मक मराठी चित्रपट राज्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना दाखविण्यास शासनाने परवानगी दिली होती. मात्र श्री समर्थ फिल्म्सने शासनाच्या अटी व शर्तीचा भंग केल्याचे निदर्शनास आल्यानंतर ही परवानगी रद्द करण्यात आली.

विद्यार्थ्यांचे प्रबोधन व्हावे, त्यांच्या सामाजिक जाणिवा प्रगल्भ व्हाव्यात या उद्देशाने शासनाने नवी मुंबई येथील श्री समर्थ फिल्म्स निर्मित जिंकी रे जिंकी हा शैक्षणिक व सामाजिक प्रबोधनात्मक मराठी चित्रपट राज्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना दाखविण्यास शासनाने परवानगी दिली होती. याकरिता शासनाने काही अटी व शर्ती लागू केल्या होत्या. त्या अनुषंगाने उत्तर विभागातील विद्यार्थ्यांना हा चित्रपट दाखविण्यात येणार होता. मात्र हि निर्मिती संस्था शासनाच्या अटी व शर्तीचे उल्लंघन करत असल्याचे विजय सोंडे यांनी पत्राद्वारे शासनास कळवले. या पत्राची दखल घेत शासनाने चौकशी केली असता तक्रारीमध्ये तथ्य असल्याचे स्पष्ट झाले.

त्यामुळे शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता देण्यात आलेली परवानगी रद्द करण्यात आल्याचे उत्तर विभाग शिक्षण निरीक्षक डॉ. मुश्ताक शेख यांनी पत्राद्वारे कळवले आहे.

हा चित्रपट पाहण्यास विद्यार्थ्यांकडून २० रुपयांपेक्षा जास्त मूल्य आकारण्यात येऊ नये तसेच विद्यार्थ्यांना चित्रपट पाहण्याची सक्ती केली जाऊ नये अशी शासनाची अट होती. त्या अटीमध्ये बदल करून संबंधित शासन निर्णय शाळांना पाठविण्याचा खोडसाळपणा चित्रपटनिर्मिती संस्थेने केल्याचे तक्रारदार विजय सोंडे यांनी निदर्शनास आणून दिले. शिवाय मराठी चित्रपटच दाखविण्याचा नियम असताना युट्यूबवरील प्रमाणपत्र न मिळालेले हिंदी चित्रपट दाखविण्यात येत असे असे देखील सोंडे यांनी म्हटले आहे. शाळा प्रशासनाने देखील अशा पत्रांची शहानिशा करावी. चुकीच्या पत्रांना बळी पडू नये अशी आवाहनवजा विनंती त्यांनी केली.

स्वामी विवेकानंद महाविद्यालयातील

युवकांनी दिला 'नो ड्रग्स'चा नारा

स्वामी विवेकानंद कला व वाणिज्य रात्र महाविद्यालयांतील युवकांनी भारत नशामुक्त करण्याचा संकल्प व निर्धार

दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी) :

राष्ट्रीय शिक्षण संस्था संचालित स्वामी विवेकानंद कला व वाणिज्य रात्र महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना आणि समाजकल्याण विभाग, नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने निवासी शिबिर स्वामी विवेकानंद प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा वाशाळा येथे कार्यक्रमाचे आयोजन सोमवारी करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे व मार्गदर्शन नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य चे कार्यक्रम समन्वयक मिलिंद पाटील यांनी Say No To Drug's Yes To Life या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले. मिलिंद पाटील यांनी मार्गदर्शनात युवकांना तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थांच्या व्यसनांचा समाजावर मोठा परिणाम होत आहे. अनेकांना कर्करोगासारख्या आजारांना सामोरे जावे लागत आहे. युवकांनी व्यसन केल्यास त्याचा परिणाम आरोग्यासह शिक्षणावरही होत आहे. अंमली पदार्थ यापासून परावृत्त होण्यासाठी मार्गदर्शन करून आपल्या परिसरात अशा अमली पदार्थांची विक्री अथवा वापर होणार नाही यासाठी आपण सर्वांनीच सतर्क राहून राष्ट्रीय कार्यात हातभार लावण्याचे आवाहन केले.

तसेच अमली पदार्थाच्या विरोधात वातावरण निर्मिती करत व्यसन सोडा माणसे जोडा, जिवन खूप सुंदर आहे आणि त्याकरिता व्यसनमुक्त जिवन जगण्याचं आवाहन केले.

यावेळी स्वामी विवेकानंद कला व वाणिज्य रात्र महाविद्यालयांतील प्राचार्य डॉ. अनुजा पळसुले देसाई, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. सूर्यकांत शेळके, डॉ. सुभाष पंडित, डॉ. सुरेश चंद्रात्रे, राष्ट्रीय सेवा योजनेचे ५० युवकांना सहभाग घेतला. यावेळी कार्यक्रमाची सांगता अंमली पदार्थ विरोधी शपथ नी करण्यात आली असल्याची माहिती नशाबंदी मंडळाचे कार्यक्रम समन्वयक मिलिंद पाटील यांनी दिली.

भारतीय सशस्त्र सैन्यदलामध्ये

अधिकारी पदाच्या पूर्व प्रशिक्षणाची मोफत सूवर्णसंधी

दै.ठाणे जीवनदिप वार्ता ठाणे(प्रतिनिधी) :

भारतीय सैन्यदल, नौदल व वायुदलामध्ये अधिकारी पदावर भरती होण्यासाठी पात्र उमेदवारांना Service Selection Board (SSB) या परिक्षेची पूर्वतयारी करुन घेण्यासाठी छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक येथे महाराष्ट्र शासनातर्फे महाराष्ट्रातील नवयुवक व नवयुवतींसाठी दि.३० डिसेंबर २०२४ ते दि.८ जानेवारी २०२५ या कालावधीत एसएसबी कोर्स क्रमांक ६० आयोजित करण्यात येत आहे, कोर्स कालावधीत प्रशिक्षनार्थींना निःशुल्क प्रशिक्षण, निवास व भोजन दिले जाते.

तरी, ठाणे व पालघर जिल्ह्यातील इच्छुक उमेदवारांनी सैन्यदलातील अधिकारी पदाची संधी उपभोगण्यासाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, ठाणे येथे दि.२३ डिसेंबर २०२४ रोजी मुलाखतीस हजर रहावे. मुलाखतीस येतेवेळी त्यांनी Department of Sainik Welfare, Pune(DSW) यांच्या वेबसाईटवर

सर्च करुन त्यामधील SSB-60 कोर्ससाठी (किंवा संबंधीत जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाने प्रिंट दिलेल्या) प्रवेशपत्र व त्यासोबत असलेली परिशिष्टांची प्रिंट घेवून व ते पूर्ण भरून सोबत घेऊन यावे.

या एसएसबी वर्गामध्ये प्रवेश मिळण्यासाठी खाली नमूद कोणतीही एक पात्रता आवश्यक आहे व त्यासंबंधीचे पात्रता प्रमाणपत्र कोर्सला येताना सोबत घेवून यावेतः-

(अ) कंबाइंड डिफेन्स सर्व्हिसेस एक्झामिनेशन (CDSE-UPSC) अथवा नॅशनल डिफेंस ॲकेडमी एक्झामिनेशन (NDA-UPSC) पास झालेली असावी व त्यासाठी सर्व्हिसेस सिलेक्शन बोर्ड मुलाखातीसाठी पात्र झालेले असावे.

(ब) एनसीसी 'C' सर्टिफिकेट 'A' किंवा 'B' ग्रेड मध्ये पास झालेले असावेत व एनसीसी ग्रुप हेडक्वार्टरने एसएसबी साठी शिफारस केलेली असावी.

(क) टेक्निकल ग्रॅज्युएट कोर्ससाठी एसएसबी मुलाखती साठी कॉल लेटर असावे.

(ड) विद्यापीठ प्रवेश प्रणाली (University Entry Scheme) साठी एसएसबी कॉल लेटर असावे किंवा एसएसबी साठी शिफारस केलेल्या यादीत नाव असावे. अधिक माहितीसाठी प्रभारी अधिकारी, छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक यांचा ईमेल आयडी training.pctcnashik@gmail.com व दूरध्वनी क्र. ०२५३-२४५१०३२ व भ्रमणध्वनी क्र. ९१५६०७३३०६ असून कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष अथवा दूरध्वनीवर संपर्क करावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ठाणे/पालघर मेजर प्रांजळ जाधव (निवृत्त) यांनी केले आहे.

नियमित वाचा
दैं. ठाणे
जीवनदीप वार्ता

बेवारस वाहनांवर कारवाईचा बडगा

उल्हासनगर मनपा आणि वाहतूक पोलिसांची कारवाई

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
☐ प्रतिनिधी

उल्हासनगर : उल्हासनगर शहरातील विविध रस्त्यांवर उभी असलेली बेवारस वाहने वातुकीसाठी अडथळा ठरत होती. सोबतच या वाहनांमुळे परिसराचे विद्रुपीकरण होणार होते. त्यामुळे या वाहनांवर कारवाई करण्याची मागणी होत होती. त्यानुसार नुकतीच उल्हासनगर महापालिकेने स्थानिक पोलीस आणि शहर वाहतूक शाखेच्या मदतीने शहरातील बेवारस वाहनांवर कारवाई केली आहे. नोटीस दिल्यानंतर एकूण ३७ वाहने मालकांनी हटवली. तर १२ वाहने पालिकेने जप्त केली आहेत.

उल्हासनगर शहराचा बहुतांश भाग व्यापारी आहे. शहरातील जवळपास सर्वच भागांमध्ये विविध प्रकारच्या बाजारपेठा आहेत. त्यामुळे शहरात दररोज हजारो वाहने शहरात येजा करत असतात. उल्हासनगर शहराची प्रति चौरस मीटर लोकसंख्येची घनता मोठी आहे. शहरातील रस्त्यांची रूंदीही कमी आहे. त्यात शहरातील विविध भागात रस्त्याच्या दोन्ही कडेला उभी केली जाणारी वाहने वाहतुकीसाठी डोकेदुखी ठरतात. खुद्द पालिकेच्या परिवहन सेवेलाही या वाहनांचा फटका बसतो. या वाहनांसह शहरातील रस्त्यांच्या कडेला उभी असलेली बेवासर वाहने रस्ते वाहतुकीसाठी अडचणीची ठरत होती. त्यामुळे रस्ते अतिक्रमणमुक्त राहण्यासाठी उल्हासनगर महापालिकेने कारवाई सुरू केली होती.

चारही प्रभाग समिती कार्यालयांच्या सहायक आयुक्तांना यासाठी आदेश देण्यात आले होते. त्यानुसार शहर वाहतूक शाखेच्या वरिष्ठ पोलीस निरिक्षकांच्या मदतीने शहरातील अशा बेवारस वाहनांवर कारवाई सुरू करण्यात आली होती. शहरातील विविध भागात ४९ बेवारस वाहने पडून असल्याचे पालिकेच्या निदर्शनास आले होते. त्यामुळे उल्हासनगर महापालिकेच्या वतीने अशा वाहनांवर नोटीस चिटकावण्यात आली होती. ही वाहने काढण्याचे आदेश पालिका प्रशासनाने संबंधित वाहन मालकांना दिले होते. मुदतीत वाहने न काढल्यास त्यावर कारवाई करण्याचा इशाराही पालिका प्रशासनाने दिला होता. ही मुदत संपल्यानंतर उल्हासनगर महापालिकेने मंगळवारपासून अशा वाहनांवर कारवाई सुरू केली. ४९ पैकी ३७ वाहने वाहन मालकांनी हटवल्याने त्यावर कारवाई झाली नाही. मात्र उर्वरित १२ वाहनांवर पालिका प्रशासनाने कारवाई केली आणि ती वाहने हटवली. ही वाहने आता जप्त करण्यात आली आहेत. यापुढेही ही कारवाई सुरूच राहणार असल्याची माहिती पालिका प्रशासनाने दिली आहे.

उद्वाहनाविना उरण,न्हावाशेवा स्थानकांत ज्येष्ठांचे हाल

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

उरण : रेल्वे स्थानकात चढ-उतार करण्यासाठी उद्वाहनाची व्यवस्था करण्यात आली आहे. मात्र उद्वाहन सुरू नसल्याने जेष्ठ नागरिक आणि महिलांचे हाल सुरू आहेत. उरण ते नेरुळ / बेलापूर या लोकल मार्गावरील लिफ्ट सुरू होण्याची प्रवाशांना गेल्या अकरा महिन्यांपासून प्रतीक्षा आहे.

१२ जानेवारीला उरण ते नेरुळ/ बेलापूर दरम्यानची लोकल सुरू झाली आहे. मात्र गेल्या अकरा महिन्यांपासून उरण परिसरातील उरण, द्रोणागिरी,न्हावा शेवा व शेमटीखार या चारही स्थानकातील उद्वाहने आतापर्यंत सुरू झालेली नाहीत. यातील उरण आणि द्रोणागिरी या दोन्ही स्थानकात भुयारी मार्गाने ये - जा करता येते, मात्र न्हावा शेवा व शेमटीखार या स्थानकांच्या फलाटांवर जाण्यासाठी ६५ पायऱ्या चढाव्या व उतराव्या लागत आहेत. त्यामुळे या स्थानकांतून प्रवास करणाऱ्या ज्येष्ठ नागरिक, महिलांना याचा त्रास सहन करावा लागत आहे.

गेल्या वर्षभरापासून येथील प्रवाशांना उद्वाहन सुरू होण्याची प्रतीक्षा आहे. मी ज्येष्ठ नागरिक असून नवी मुंबईत जाण्यासाठी येथील स्थानकातून प्रवास करीत आहे. मात्र या स्थानकातील लिफ्ट गेल्या सुरूच झालेली नसल्याची माहिती नंदकुमार पाटील यांनी दिली आहे. या संदर्भात मध्य रेल्वेच्या जनसंपर्क अधिकारी पी.डी. पाटील यांच्याशी संपर्क केला असता माहिती घेऊन सांगतो असे सांगितल

सक्रिय क्षयरुग्ण शोध मोहीम यशस्वीपणे राबवा

–मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांचे निर्देश

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
☐ प्रतिनिधी

ठाणे / दि. १७ - राष्ट्रीय क्षयरोग दूरीकरण कार्यक्रमांतर्गत सक्रिय क्षयरुग्ण शोध मोहीम ठाणे जिल्ह्यात यशस्वीपणे राबवण्यासाठी आरोग्य विभागामार्फत नियोजन करण्यात येत आहे. सक्रिय क्षयरुग्ण शोध मोहीम २३ डिसेंबर, २०२४ ते ३ जानेवारी, २०२५ या कालावधीत राबवण्यात येणार असून मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा समन्वय समिती सभा आज, दि. १७ डिसेंबर २०२४ रोजी जिल्हा परिषदेच्या सभागृहात संपन्न झाली. आशा सेविकांमार्फत अति जोखमीच्या भागात सक्रिय क्षयरुग्ण शोध मोहीम राबवण्यासाठी सुयोग्य नियोजन करावे, असे निर्देश मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी यावेळी दिले.

सक्रिय क्षयरुग्ण शोध मोहीम राबवण्यासाठी ९५ गटामार्फत अति जोखमीच्या ठिकाणी विटभट्टी कामगार, झोपडपट्टी, आश्रमशाळा इ. ठिकाणी आशा सेविका मार्फत घरोघरी जाऊन सर्वेक्षण करून क्षयरोगाचे जास्तीत जास्त निदान होण्याकरिता क्षयरुग्णांचा शोध घेऊन त्यांचे निदान करण्यात येईल, अशी माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे यांनी दिली.

यावेळी राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत सक्रिय क्षयरुग्ण शोध मोहीम राबविण्याचा जिल्ह्याचा कृती आराखडा व नियोजन जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. अलका परगे यांनी सविस्तर माहिती दिली. निवासी बाह्य संपर्क अधिकारी डॉ. मृणाली राहुड, जिल्हा माता व बालसंगोपन अधिकारी डॉ. स्वाती पाटिल, साई होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालय दुगाड फाटा दाभाड भिवंडी चे प्राध्यापक डॉ. अर्चना कोटलवार, बी. आर. हारणे आयुर्वेदिक वैद्यकीय महाविद्यालय चे प्राध्यापक डॉ. तेजस मोरे, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक डॉ. अमोल बाग तसेच जिल्हा क्षयरोग अधिकारी- कर्मचारी उपस्थित होते.

कळंबोली - खांदेश्वरमध्ये १७ लाखांची विजचोरी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता ☐ प्रतिनिधी

पनवेल : खांदेश्वर वसाहतीमध्ये आणि कळंबोली गावामध्ये दोन वेगवेगळ्या ठिकाणी विजचोरी केल्यामुळे वीज महावितरण कंपनीने दोन वेगवेगळ्या पोलीस ठाण्यांमध्ये विज चोरी केलेल्या व्यक्तींविरोधात गुन्हे नोंदविले आहेत. खांदेश्वर वसाहतीमधील सेक्टर ११ येथील मंगलमूर्ती टॉवरमधील एका वीज ग्राहकाने ७१,६९९ युनिट वीजेची चोरी केल्याचे वीज महावितरण कंपनीचे अभियंत्यांच्या तपासणीमध्ये आढळल्याने तब्बल १५ लाख २३ हजार ५१० रुपयांचे विजेचे देयक न भरल्याने खांदेश्वर पोलीस ठाण्यात वीज ग्राहकाविरोधात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.तसेच कळंबोली गावातील एका वीज ग्राहकाने मागील वर्षी नोव्हेंबर महिन्यापासून ते या वर्षी सप्टेंबर महिन्यापर्यंत ७,४२८ वीज युनीटची चोरी केल्याने वीज महावितरण कंपनीने या विज ग्राहकाविरोधात २ लाख ५५ हजार ३७० रुपयांची विज चोरी केल्यामुळे कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविला आहे.

पिसाळलेल्या कुत्र्याचा लहान मुलावर जीवघेणा हल्ला

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
☐ प्रतिनिधी

भाईंदर : मिरा रोड येथे एका पिसाळलेल्या श्वानाने लहान मुलावर जीवघेणा हल्ला केल्याची घटना घडली आहे. यात मुलाच्या डोक्याला आणि तोंडाला गंभीर इजा झाली असून खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

दक्ष रावत(८) असे जखमी झालेल्या मुलाचे नाव आहे. मिरा रोडच्या पूनम सागर परिसरात सोमवारी रात्री नऊच्या सुमारास हा प्रकार घडला.हा मुलगा याच भागात राहत असून रात्री मित्रांसोबत खेळत होता.यावेळी एक भटका श्वान त्यामागे लागला. त्याने प्रतिकार करण्याच्या आतच भटक्या श्वानाने त्याच्या तोंडावर आणि डोक्यावर चावे घेतले.मुलाने आराडा- ओरडा केल्याने त्याची सुटका झाली. मात्र तो पर्यंत मुलाच्या शरीरातून रक्ताच्या झरा वाहू लागल्या होत्या.कुटुंबियांनी त्याला जवळच्या खाजगी रुग्णालयात दाखल केले आहे.मुलाच्या तोंडाला गंभीर जखम झाल्याने प्लास्टिक सर्जरी करण्याचा सल्ला डॉक्टरांनी दिला आहे.

दिवसाला सरासरी ४० जणांना श्वान दंश

मिरा भाईंदर शहरात भटक्या श्वानाचा उपद्रव मोठ्या प्रमाणात वाढला आहे. शहरात जवळपास ३० हजार भटके श्वान असून ते टोळीने नागरिकांवर हल्ला करत आहेत. जानेवारी महिन्यापासून आता पर्यंत जवळपास १२ हजाराहून अधिक जणांना श्वानदंश झाल्याची नोंद झाली आहे. त्यानुसार शहरात दर दिवसाला ४० जणांना श्वानदंश होत असून पालिका प्रशासनाच्या उपायोजना कागदावरच असल्याचे आरोप होत आहेत.

जहां नहीं चैना वहां नहीं ...

पान १ वरून ▶▶ आता पुढची भुमिका काय ? असे सवाल छगन भुजबळ यांना विचारण्यात आले. त्यावर त्यांनी आपल्या स्टाईलने एकाच वाक्यात उत्तर दिलं. आता बघू, जहां नहीं चैना वहां नहीं असं म्हणत छगन भुजबळ यांनी मोठं सूचक विधान केलं आहे.

छगन भुजबळ यांच्या या विधानाचे अनेक अर्थ लावले जात आहेत. भुजबळ हे अजितदादांची साथ सोडणार असल्याचे संकेत यातून मिळत आहेत. तसेच भुजबळ पुन्हा शरद पवार यांच्या गटात जाणार असल्याच्याही चर्चा आता सुरू झाल्या आहेत. त्यामुळे भुजबळ आगामी दिवसात काय निर्णय घेतात याकडे सर्वांचं लक्षल लागलं आहे.

प्रतारणा करणार नाही

मंत्रिपदाबाबत माझ्या नावाची चर्चा होती. पण ऐनवेळी माझं नाव का काढलं मला माहीत नाही. ७-८ दिवसांपूर्वी मला राज्यसभेवर पाठवण्याचं प्रपोजल पक्षाकडून दिलं होतं. पण मी हा प्रस्ताव नाकारला. कारण मला राज्यसभेवर जायचं नाही. मागच्यावेळी मी म्हणालो होतो. तेव्हा ते ठिक होतं. पण मी आताच निवडून आल्याने लगेच राज्यसभेवर जाणं मला मान्य नाही. कारण मी आता राजीनामा दिला तर माझ्या मतदारांशी तो विश्वासघात ठरेल. माझे मतदार रागावणार नाहीत. पण त्यांच्याशी मी प्रतारणा करू शकत नाही, असं छगन भुजबळ यांनी ठणकावलं.

थेट नाशिकला जाणार

मला त्यांनी बक्षिस दिलं आहे. कसलं बक्षिस दिलं हे माहीत नाही. पण तुम्ही विचारता त्यावर मी एका एका वाक्यात बोलत आहे. जे काही होईल ते अपेक्षित नव्हतं. मला वाटलंही नव्हतं. पण ठिक आहे. मी त्यांचा राज्यसभेचा प्रस्ताव नाकारला आहे. आता मी थेट नाशिकला जाणार आहे. माझ्या लोकांशी चर्चा करणार आहे, असंही त्यांनी स्पष्ट केलं.

कुणी फेकलं, डावललं तरी काय फरक पडतो ?

कुणी फेकलं, डावललं तरी काय फरक पडतो असं सांगून भुजबळांनी उघड नाराजी व्यक्त केली. नागपूर अधिवेशनच्या पहिल्याच दिवशी भुजबळांनी त्यांची नाराजी व्यक्त करून अधिवेशनातून काढता पाय घेत नाशिकला रवाना झाले. आज ते समता परिषदेच्या कार्यकर्त्यांसह मतदारसंघातील लोकांशी चर्चा करणार आहे. त्यामुळे छगन भुजबळ यांची नाराजी दूर होणार की ते पक्ष सोडणार असा प्रश्न अनेकांना पडला आहे. नाशिकमध्ये छगन भुजबळ यांनी पत्रकारांशी बोलताना स्पष्टपणे राज्यसभेची ऑफर नाकारल्याचं सांगितले. भुजबळ म्हणाले की, मला ८ दिवसांपूर्वी सांगण्यात आले होते, परंतु मी माझ्या विधानसभा सदस्याचा राजीनामा देऊ शकत नाही. ती माझ्या मतदारांची प्रतारणा ठरेल. मी जाणार नाही असं सांगितले. त्यानंतर माझी अजितदादांशी कुठलीही चर्चा नाही. नाशिकला लोकांना भेटणार आहे असं त्यांनी म्हटलं. तेव्हा जहां नहीं चैना, वहां नहीं... असं सूचक विधान केले आहे.

विधानपरिषद सभापती...

पान १ वरून ▶▶ विरोधीपक्षनेतेपदी निवडच झाली नाही. राज्यातील कुठल्याच विरोधी पक्षाकडे १/१० संख्याबळ म्हणजेच २९ आमदारांचे संख्याबळ नसल्याने विरोधी पक्षनेतेपदही विरोधकांना मिळेल की नाही हे अद्याप अस्पष्ट आहे. त्यात, विरोधी पक्षनेतेपदाचा कुठलाही प्रस्ताव सध्या नाही. विशेष म्हणजे आज झालेल्या ठाकरे आणि फडणवीस तसेच ठाकरे आणि नार्वेकरांच्या भेटीमध्ये विरोधी पक्षनेते पदाची चर्चा झालीच नसल्याचे समजते.

एनटीए घेणार उच्च शिक्षण...

पान १ वरून ▶▶ विविध प्रकारच्या परीक्षा आयोजित करण्यासाठी जबाबदार आहे. NTA आता भारतातील विद्यापीठे आणि महाविद्यालयांमध्ये प्रवेशासाठी परीक्षा आयोजित करण्याच्या भूमिकेला प्राधान्य देईल. उच्च शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सुलभ आणि अधिक कार्यक्षम प्रक्रिया सुनिश्चित करणे हा या बदलाचा उद्देश आहे. मात्र, या बदलाची नेमकी टाइमलाइन देण्यात आलेली नाही. पुढील काही वर्षांत त्याची हळूहळू अंमलबजावणी होईल, अशी अपेक्षा आहे.

NEET UG पेपर फुटल्यामुळे NTA प्रसिद्धीच्या झोतात आले

NEET UG पेपर लीक झाल्यामुळे NTA प्रसिद्धीच्या झोतात आले होते. यावरून विरोधकांनी सरकारवर जोरदार निशाणा साधला होता. पेपरफुटीनंतर एनटीए प्रमुख सुबोध कुमार सिंह यांची बदली करण्यात आली होती. जुलैमध्ये, सर्वोच्च न्यायालयाने NEET UG २०२४ परीक्षा रद्द करून पुन्हा परीक्षा घेण्याची मागणी करणारी याचिका फेटाळली होती. CJI म्हणाले की प्रश्नपत्रिका पद्धतशीरपणे लीक आणि इतर अनियमितता दर्शविणारा कोणताही डेटा रेकॉर्डवर नाही.

NTA द्वारे कोणत्या परीक्षा घेतल्या जातात?

नॅशनल टेस्टिंग एजन्सी (NTA) ही एक स्वायत्त आणि स्वावलंबी चाचणी संस्था आहे. या संस्थेद्वारे उच्च शिक्षण संस्थां तसेच फेलोशिपसाठी प्रवेश परीक्षा घेतल्या जातात. NTA द्वारे UGC NET, CUET, JEE (मुख्य), NEET - UG, CMAT, GPAT इ. प्रवेश परीक्षा आयोजित केल्या जातात. नोव्हेंबर २०१७ मध्ये NTA ची स्थापना करण्यात आली होती.

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
मध्ये कंपनी, मिळकत, जमीन- जुमला, सहकारी संस्थांच्या नोटीस तसेच बक्षीसपत्र, घटस्फोट आणि पोटगी, नावात बदल बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क साधा.
कार्यालय - 9619188558 ■ +91 9158078601

जिल्हा परिषदेमार्फत शेतकऱ्यांचा...

पान१ वरून ▶▶ याप्रसंगी, तंत्रज्ञानाच्या वापराने शेती विकसीत करण्याच्या दृष्टीने मार्गदर्शन करत असताना ठाणे जिल्ह्यात भातशेती मोठ्याप्रमाणात करत असून शेतकऱ्यांनी विविध पिकांची लागवड करणे आवश्यक आहे. फुल, फळ तसेच बाजारात ज्या पिकांची मागणी असते त्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात यावे. यासाठी आवश्यक त्या योजना राबवण्यासाठी जिल्हा परिषद प्रयत्नशील असेल, असे आश्वासन ही मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिले. कुक्कुटपालन सोबत शेती करणे आवश्यक असून विविध जोड व्यवसाय करून शेतकऱ्यांनी आर्थिक स्वावलंबी व्हावे तसेच तंत्रज्ञानाचा वापर करावा, असे मार्गदर्शन अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अजिंक्य पवार यांनी केले.

यावेळी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी श्री. रामेश्वर पाचे, झिनिक्स इंटरनॅशनलचे अध्यक्ष श्री. खलील शेख, कृषी तज्ञ श्री.उत्तम सहाने, कृषी तज्ञ डॉ. नामदेव म्हसकर, जिल्हा कृषी अधिकारी श्रीम. सायली आडसुळ, कृषी विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

प्रस्तावना करताना कृषी विकास अधिकारी श्री मुनिर बाचोटीकर यांनी पद्मश्री सिंधुताई सपकाळ स्वाभिमान योजना अंतर्गत शेतकरी/शेतमजूर/बचत गट/ग्रामसंघ यांना भाजीपाला विक्रीसाठी साहित्य तसेच ई -कार्ट पुरविणे या योजना राबवित असून या योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांनी मिळवलेल्या यशाचे कौतुक करण्यासाठी सन्मान सोहळा करण्यात आलेला आहे. वैयक्तिक प्रगतशील शेतकरी १० तर गट शेती ९ गटांचा सन्मान करण्यात येत असल्याचे यावेळी सांगितले. कृषी तज्ञ डॉ. नामदेव म्हसकर यांनी नैसर्गिक शेती तर कृषी तज्ञ उत्तम सहाने यांनी रब्बी हंगामातील भाजीपाला लागवड व मधुमक्षिका पालन या विषयावर उपस्थित शेतकऱ्यांना सखोल मार्गदर्शन केले. कार्यक्रम स्थळी शेतकऱ्यांना उपयुक्ती शेती साहित्य बाबत तसेच विविध कीटकनाशके, स्प्रेयर्स यांचे स्टॉल लावण्यात येऊन मार्गदर्शन करण्यात आले तसेच बचत गट यांच्याकडील तांदूळ, पौष्टिक तृणधान्य पदार्थ व भाजीपाला विक्रीसाठी उपलब्ध करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. तरुलता धानके यांनी केले.

शिवसेनेत अस्वस्थता...?

पान १ वरून ▶▶ मिळाला आहे. त्यामुळे ते नाराज असल्याची माहिती समोर येत आहे. मंत्रिपद न मिळाल्यामुळे तानाजी सावंत नाराज झाले आहेत. नागपूर येथे सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनाला न थांबता ते पुण्यातील बालाजी नगर येथील कार्यालयात परतले आहेत. माध्यमांसमोर येण्यासाठी तानाजी सावंत यांनी नकार दिला आहे. मंत्रिमंडळ विस्तारात स्थान न मिळाल्यानं शिवसेना शिंदे गटातील नेते नाराज आहे, आता त्यांची नाराजी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे कशी दूर करणार हे पाहाणं महत्त्वाचं ठरणार आहे.

जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
जीवनदीप कॉलेज,खर्डी
मुंबई विद्यापीठाशी संलग्न, ISO ९००१:२००५
ADMISSION OPEN 2024-25
११ वी व १२ वी
ARTS, COMMERCE, SCIENCE (IT)
UNDER GRADUATE: B.Sc. I.T., B.Sc. CHEMISTRY MATHS, B.A.F., BAMMC, B.Com., B.A.
POST GRADUATE: M.Sc. IT, M.Sc. CHEMISTRY, M.Com. ADVANCED ACCOUNTANCY, M.A. MARATHI, M.A. ECONOMICS, M.A. SOCIOLOGY, M.A. GEOGRAPHY
Look forward to a BRIGHTER FUTURE
8669244522
9923992390

किसन कथोरेंनी घेतली...

पान१ वरून ▶▶ संपादन केला आहे. त्यामुळे विरोधकांना दाखवून देण्यासाठी तरी आमदार कथोरे यांना मंत्रिपद देण्यात यावे असे समर्थकांचे मत आहे. मंत्रिपद न मिळाल्याच्या नाराजीतून आमदार किसन कथोरे यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेतली का, अशी चर्चा सुरू झाली आहे.

विकास कामांवर चर्चा

मुरबाड-माळशेज घाट मार्गातील वाहतूक वाढली आहे. या घाटातील रखडलेले रस्ते काम मार्गी लावावे. घाटातील बोगद्याचे काम हाती घेण्यासाठी सहकार्य करावे. माळशेज घाटात पर्यटनचा विचार करून आकाश उंच भिंत (स्काय वॉल) बांधण्यासाठी निधी, बदलापूर शहरात बाह्यवळण रस्ता, शिळफाटा काटई-नेवाळी-बोराडपाडा-म्हसा-धसई-माळशेज घाट रस्त्याला महामार्गाचा दर्जा देणे, याविकास कामांच्या विषयावर केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या सोबत चर्चा केली, असे आमदार कथोरे यांनी सांगितले.

म्हाडाची घरं भाडेतत्वावर?

पान १ वरून ▶▶ विविध कारणांमुळे तसेच कादपत्रांची पूर्तता न झाल्यास अनेकांना म्हाडाचे घरं खरेदी करता येत नाही. मुंबईत स्वतःचे घर नसलेले तसेच शिक्षणासाठी आणि कामानिमित्ताने मुंबईत राहणाऱ्यांना भाड्याने घर घेऊन रहावे लागते. अशा लोकांना म्हाडाच्या एका निर्णयामुळे मोठा दिलासा मिळणार आहे. मुंबईत भाड्याने घरे उपलब्ध करून देण्याची तयारी म्हाडा करत आहे. म्हाडाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी अनिल वानखेडे यांनी याबाबत माहिती दिली. मुंबईत नोकरीसाठी तसेच शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांना तसेच नोकरी करणाऱ्या महिलांना म्हाडाची घरं भाड्याने दिली जाणार आहेत.

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक श्री. रविंद्र नारायण घोडविंदे तथा कार्यकारी संपादक विजय गोविंद यादव यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले. (या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९१५८०७८६०१ E Mail – jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024 (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी